जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 SEP 2026

सिंधुदुर्ग समाचार

# शिवाजी विद्यापीठाच्या काळसेकर पुरस्कारांचे 29 सप्टेंबरला वितरण

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या सन २०२६ च्या काळसेकर पुरस्कारांचा वितरण समारंभ येत्या २९ सप्टेंबर रोजी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते होणार आहे. ही माहिती मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारे २०२६ सालचे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार आणि ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार हे अनुक्रमे ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर आणि कवी रवी कोरडे यांना यापूर्वीच जाहीर करण्यात आले आहेत. ज्येष्ठ साहित्यिक, कवी, समीक्षक प्रा. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते येत्या मंगळवारी (दि. २९) विद्यापीठाच्या गणित अधिविभागातील रामानुजन सभागृहात सकाळी १०.३० वाजता पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत असतील. आदित्य काळसेकर यांच्यासह काळसेकर कुटुंबीयही समारंभास उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 SEP 2026
जनप्रवास



# शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेत माडखोलकर महाविद्यालयाच्या कांबळेचे सुयश

- 'चंदगडचा शिमगोत्सव : एक अनोखी परंपरा' लेखाला प्रथम क्रमांक प्राप्त

**जनप्रवास : हलकर्णी**

चंदगड ग्रामीण भागातील लोकपरंपरा, संस्कृती आणि सामाजिक जीवनाचे अभ्यासपूर्ण दस्तऐवजीकरण करणाऱ्या लेखणीला शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेत दाद मिळाली आहे. चंदगड येथील खेडूत शिक्षण मंडळाच्या र. भा. माडखोलकर महाविद्यालयाचा विद्यार्थी अक्षय कांबळे याने लिहिलेल्या 'चंदगडचा शिमगोत्सव : एक अनोखी परंपरा' या माहितीपूर्ण लेखाला शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पाच हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र मिळाले.

अक्षय कांबळे याचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एम. एम. माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी 'खेडूत' नियतकालिकाचे संपादक व मार्गदर्शक प्रा. एस. व्ही. कुलकर्णी, डॉ. आर. के. तेलगोटे, डॉ. आर. ए. कमलाकर, डॉ. पी. एल. भादवणकर, डॉ. एस. एस. सावंत, डॉ. मोहन घोळसे, डॉ. जी. वाय. कांबळे, डॉ. ए. वाय. जाधव, डॉ. एन. एस. मासाळ, प्रा. एस. एम. पाटील, डॉ. एस. एन. पाटील, डॉ. एन. के. पाटील, प्रा. व्ही. के. गावडे, प्रा. ए. डी. कांबळे आदी उपस्थित होते.प्रभारी प्राचार्य डॉ. माने यांनी अक्षयचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 SEP 2026
तरुण भारत

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : थोर समाजसुधारक व शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत व प्र-कुलगुरू ज्योती जाधव यांच्या हस्ते विद्यापीठ परिसरातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सावळीराम घाणे, डॉ. कबीर खराडे, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. मीना पोतदार, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. धनश्री शिंदे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. अभिजीत पाटील, डॉ. सुधीर पोवार यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.